# प्रशांती संदेश

## प्रशांती संदेश, भाग ७१

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांचे स्वागत. यासाठी आपण दिलेल्या वेळाबद्दल खूप आभार.

आजच्या सत्रातील विषय आहे, (मानवी) आयुष्य हा एक प्रवाह आहे. मी पुन्हा सांगतो, 'आयुष्य हा एक प्रवाह आहे.' हा जीवनप्रवाह, एखाद्या नदीच्या, सतत वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणे आहे. हा प्रवाह सतत बदलत असतो. तसेच, तो कधीही एकाच ठिकाणी साठून राहत नाही किंवा डबक्याप्रमाणे तुंबत नाही. जर तो एखाद्या ठिकाणी अडकला, तुंबला, तर मनुष्याची प्रगती खुंटते आणि डबक्यात साठलेल्या पाण्याला जशी दुर्गंधी येते, त्याप्रमाणे त्या माणसाची स्थिती होते. तेव्हा आपला जीवनप्रवाह हा अविरतपणे वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे हवा. टेनिसनचे वाक्य आहे की, 'जुन्या गोष्टींमध्ये नेहमीच परिवर्तन होऊन, त्यांची जागा, नवीन गोष्टी घेतात. याचाच अन्वायार्थ असा की आयुष्यामध्ये ते जसे जसे पुढे सरकत जाते, व्यतीत होते, त्याप्रमाणे, त्यात सतत परिवर्तन होत राहते. त्याचा परिणाम असा होतो की, आपणही या जीवनप्रवाहाबरोबर, कालानुसार वाहत जातो. जर, तुम्ही या प्रवाहाबरोबर राहला, तर या पर्यटनाचा तुम्ही आनंद घेऊ शकाल. जर, तुम्ही या प्रवाहाला विरोध कराल, तर तुम्ही बुडाल, खाली जाल. तेव्हा, आयुष्यात असे बुडणे किंवा अधोगतीला जाणे याला परवानगी देऊ नका. जीवन सरितेचा हा आनंददायी प्रवास आहे असे समजा आणि आयुष्य व्यतीत करताना, हा धडा शिकायचा आहे, हे लक्षात ठेवा.

या जीवनप्रवासात, आपल्याला चार टप्पे किंवा अनुक्रम/पायऱ्या, आहेत, हे समजून घ्यायला हवे. याबाबतीत, गंगा नदीवर असलेल्या घाटांचे उदाहरण घेऊया. यात्रेकरूंना, पवित्र स्नान करता यावे, यासाठी, या घाटांमधून गंगा वाहत असते. आयुष्याच्या प्रवासात, आपल्याला, अशा प्रकारच्या घाटांची किंवा प्रमुख स्थानांची माहिती करून घ्यायला हवी. मग, एका केंद्राकडून, दुसऱ्या केंद्राकडे वा स्थानाकडे, आपला प्रवास आपोआपच सुरू होतो. आपल्याला, अशा चार पायऱ्या किंवा स्थानांकडे मार्गक्रमणा करायची आहे.

पहिली पायरी आपल्याला माहीत आहेच. ती म्हणजे आपले कर्म, जे अटळ असते. आयुष्यात, प्रत्येकाला कर्म हे करावेच लागते. आपला जन्म, विकास, तसेच आपण व्यतीत केलेला वेळ, या सगळ्यामध्ये, कर्म घडतच असते. आता, एखादा माणूस म्हणेल की, मी तर अगदी स्वस्थ बसलो आहे. मी कुठे कर्म करतोय? पण, त्याला हे माहीत नाही, की, अशा स्थितीतसुद्धा, त्याचा रक्तप्रवाह चालू आहे, हृदयाचे कार्य चालू आहे, मेंदू व मज्जातंतूंचे काम चालू आहे. तेव्हा, तुम्ही जरी अगदी स्वस्थ बसलात, तरीसुद्धा तुमच्या शरीरप्रणालीचे सर्व कर्म चालूच आहे. वेगळ्या शब्दात, पुन: सांगायचे झाल्यास, असे म्हणता येईल की तुम्ही कोणत्याही अवस्थेत असला, तरी तुमचे कर्म चालूच असते. या परिस्थितीत, मी काय करायला हवे?

कोणत्याही वेळी, जेव्हा मी एखादी गोष्ट करतो, तेव्हा तेव्हा ते कर्म, माझ्याकडून जाणीवपूर्वक आणि तल्लीनतेने होणे, अपेक्षित आहे. ते कार्य सफल होण्यासाठी, मला, स्वत:ला, त्यात पूर्णपणे झोकून देऊन आणि त्यांत निमग्न होऊन, ते पार पाडले पाहिजे. तसेच, ते कर्म करताना, मी, परमेश्वराच्या हातातील एक साधन आहे, अशी मनोमन भावना हवी. यामुळे, होते काय, की, या कर्माचा भार उचलण्यासाठी, मी, परमेश्वराला आवाहन करतो, आणि यासाठी, फक्त एक साधन म्हणून, परमेश्वराने माझा स्वीकार करावा, अशी त्याला प्रार्थना करतो. या जाणीवेमुळे मी या कर्माचा कर्ता होत नाही. या सजगतेमुळे, या कर्माचा कर्ता करविता, तो ईश्वरच आहे, ही वृत्ती मनात पक्की होते. हे कर्म, मग साक्षीभावाने घडते. त्यामुळे त्यातील अहंकाराची जाणीवच पुसून टाकली जाते. या कर्माबद्दल, मला, कोणी विशेष मानमान्यता द्यावी, अशी उत्कट इच्छा पण उत्पन्न होत नाही. ज्यावेळी, यथार्थ ज्ञान होते आणि शुद्ध जाणीव प्राप्त होते, तेव्हाच अशा प्रकारची कर्मे घडतात.

आता मला, आणखी एका गोष्टीबद्दल, तुमचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे. समजा, मी, एखादे लहान मूल रडताना पाहिले, तर, मला असे वाटेल, की त्याच्याजवळ जाऊन ते का रडते आहे? त्याचे कारण काय आहे? याची चौकशी करावी. त्याचप्रमाणे, मी, जर एखाद्या भिकाऱ्याला, घोटभर पाण्यासाठी किंवा घासभर अन्नासाठी रडताना पाहिले, तर त्याच्याजवळ जाऊन, त्याला मी मदत करेन. अशा प्रकारची बाह्य परिस्थिती, मी जेव्हा पाहतो, तेव्हा माझे अंत:करण हेलावून जाते. माझ्यातील शुद्ध जाणीवेला, अंतरंगातील दिव्यत्वाला, त्याचा स्पर्श होतो. त्याचाच परिणाम म्हणून, माझ्यातील, करूणा, दयाळूपणा, उपकार करण्याची वृत्ती, स्वार्थत्याग वगैरे, दैवी गुणविशेष प्रकट होतात. अशा प्रकारे, बाह्य जगतात घडणाऱ्या आनंदी किंवा दु:खदायक प्रसंगांचा माझ्यावर परिणाम होतो. जेव्हा इतरेजन आनंदात असतात, तेव्हां, मी पण आनंदी असतो. जेव्हा, इतर मंडळी हास्यविनोद करतात, तेव्हा, मला पण हसू येते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, बाह्य परिस्थितीनुसार, माझ्या आंतरिक प्रेरणा स्फुरतात. कर्म करताना, मग परिणामांमुळे, मला सहाय्य मिळत राहते.

उदाहरणार्थ, मी रस्त्याने चालत जाताना, माझ्या वाटेत एक दगड आला आणि त्यामुळे, मला जोरात ठेच लागली, तर मी काय करतो? रस्त्यातच, खाली वाकून, तो दगड, मी उचलून बाजूला टाकतो. कारण, माझ्यासारखी ठेच, आणखी कोणाला लागू नये म्हणून. या प्रसंगी, अशी माझी प्रतिक्रिया असणार. तेव्हा, कोणत्याही बाह्य परिस्थितीला, यथोचित तोंड देण्यासाठी, माझी जी प्रतिक्रिया होईल, त्याचे स्फुरण, माझ्या अंतर्यामीच्या प्रेरणेनेच होईल.

आता, या अंत:करणातून स्फुरलेल्या प्रेरणेचे आणि जाणीवेचे, वेगळे महत्त्व काय आहे, याचा आपण विचार करूया. सामान्यत:, आपण जेव्हा एखादी कृती करायला उद्युक्त होतो, तेव्हा ते कर्म देहबुद्धीनुसार होत असते. मग, त्यात अहंभाव येतो. स्वार्थी वृत्तीने केलेली कर्मे, मग ती कितीही महान असली तरी त्यात धर्मनिष्ठा नसते. मग ती पावित्र्य आणि दिव्यत्वापासून आणखी दूरच राहतात. तेव्हा, आपल्या हातून घडणारे कर्म, निर्दोष होण्यासाठी, आपण परमेश्वराला शरण जावयास हवे. त्याला आपण हे सांगायला हवे की हे ईश्वरा, स्वर्गात घडणाऱ्या सर्व गोष्टी तुझ्या इच्छेनुसार होवो, त्याप्रमाणे या पृथ्वीवर पण तसेच घडो. या कर्माबद्दल, माझी, स्वत:ची अशी कोणतीच इच्छा नाही. तेव्हा, हे कर्म करण्यासाठी मला मार्गदर्शन कर. संपूर्ण शरणागत अवस्थेमधली माझी प्रार्थना ऐकून, तो, ईश्वरच माझ्याकरिता हे कार्य करून घेतो. अशा प्रकारच्या प्रार्थनांमुळे मला स्वातंत्र्य मिळते आणि मी मोक्षमार्गाकडे वाटचाल करू लागतो. या स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे, या कर्माचा कर्ता मी नाही, हे मनांत नीटपणे ठसणे. मग कोणतेही कार्य करताना, आपण सद्सदद्विवेकबुद्धीने आतला आवाज ऐकून, त्याची पूर्ती करतो. यालाच, कर्ममार्गाचे पूर्वाभिमुख स्थितीज्ञान म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत, याचेच, कर्मयोग असे नामाभिधान आहे. हा कर्मयोग, आता मला, पुढच्या पायरीवर, पुढच्या स्थानावर घेऊन जातो.

आता, माझी साधना, वरच्या पातळीवर सुरू होते. या टप्प्यात, ज्ञानप्राप्तीसाठी, मला, सतत प्रयत्नशील रहावयाचे आहे. त्याप्रमाणे, मी प्रारंभ करतो. ज्ञानार्जनासाठी लागणारी चौकसबुद्धी (जिज्ञासावृत्ती) आणि शोधक वृत्ती, अंगी बाणवल्यामुळे, उत्तरोत्तर, माझी प्रगती होते. यामुळे काय होते? मी जागरूक होतो. अंतिम सत्य काय आहे याची एक प्रकारची जाणीव माझ्यात येते. हे सत्य कोणते? सत्यस्वरूपाची जाणीव होणे. यथार्थ ज्ञान प्राप्त झाल्याने, मला, या सत्याची अनुभूती येते. मग काय घडते? माझी जाणीव संपूर्णतया बदलते, ही, जी जाणीव आहे, ती, नुसतीच एक कल्वना नव्हे, किंवा एखादी घोषणा नव्हे.

ब्रह्मविद् बह्मैव भवति

ब्रह्मविद् म्हणजे ब्रह्माला जो जाणतो तो, स्वत:च ब्रह्मस्वरूप होतो.

जेव्हा, त्याला हे अवगत होईल, की हे ब्रह्म, सर्वत्र, सर्व चराचर सृष्टीत ओतप्रोत भरून राहलेले आहे. ही, साधकाची अवस्था म्हणजे साधनेतील दुसरा टप्पा. तुम्हीच सत्यस्वरूप आहांत, ही अनुभूती तुम्हाला येऊ लागली की आत्मज्ञान प्राप्त होते. स्वस्वरूपावर संपूर्ण अनुसंधान आणि त्याचा सखोल आविष्कार यासाठी, तुम्हांला यथार्थ ज्ञान प्राप्त करावेच लागते.

कर्म करत असताना, बाह्य प्रसंग वा परिस्थितीनुसार, माझ्या जाणिवेमध्ये परिवर्तन घडले. त्यानुसार, माझ्या क्रिया किंवा प्रतिक्रिया झाल्या. आणि माझ्यांतील सुप्तावस्थेत असलेले करुणा, दयाभाव, त्याग आदि दैवी गुणविशेष प्रकट झाले. हा कर्मयोग झाला. ज्ञानमार्ग अनुसरताना, मला सत्याची प्रचिती येते. असे उमगते की शुद्ध जाणीव हेच सत्य आहे, खरे आहे. यात भेद नाही, अंतर नाही. ही, जाणीव अपरिवर्तनीय, सनातन, निष्कलंक आणि स्फटिकासारखी स्वच्छ आहे. सर्वकालीन, त्रिकालाबाधित सत्य आहे. अशा प्रकारे, ज्ञानमार्गामुळे त्या चिरंतन, शाश्वत सत्याचा आविष्कार होतो. ज्ञानाचे तत्त्व व महत्त्व यांचे आकलन होते, ही, झाली साधनेची दुसरी पायरी, यानंतर आपण तिसऱ्या पायरीकडे, तिसऱ्या स्थानाकडे जातो. हा भक्तीयोगाचा मार्ग आहे. पहिल्या पायरीवर असताना, बाह्य प्रसंग वा परिस्थितीमुळे, तुमच्या जाणीवेवर परिणाम होतो आणि सुप्तावस्थेत असलेल्या दैवी सद्गुणांचे पाठबळ लाभते, अंतर्यामी स्थित असलेल्या ईश्वराकडून,पाठबळ लाभते.

दुसऱ्या पायरीवर असताना, हीच जाणीव, अशा बाह्य प्रसंगांत किंवा परिस्थितीत तुमच्या दृष्टिकोनात, आकलनशक्तीत, समजुतीत पूर्ण बदल घडवते आणि सत्यस्वरूपाकडे घेऊन जाते.

आता, भक्तीयोगाची जी तिसरी पायरी किंवा स्थान आहे, तेथे काय घडते ते पाहू. कर्मयोग आणि ज्ञानयोग यांची, अंतर्यामी असलेल्या दिव्यत्वाशी तुमच्या सत्यस्वरूपाशी, करुणा, दया, त्याग इत्यादी गुणविशेषांसह भेट होते, त्यामुळे या दोन्ही मार्गात भेद नाही, हे उमगते.

उदाहरण द्यायचे झाल्यास– ज्याप्रमाणे, प्रियतम आणि प्रियतमा यांचे मीलन होते, तेव्हा त्यांचे संपूर्ण ऐक्य होते, त्याप्रमाणे. भक्तीयोगात विशुद्ध प्रेमाचा उद्भव होतो. आरंभी, कर्मयोग आणि ज्ञानयोग यांची मार्गक्रमणा समांतर रेषांप्रमाणे होती. पुढे, ते जेंव्हा एकमेकांना मिळाले, त्यांचा सुरेख संगम झाला, तेव्हा त्यातून विशुद्ध प्रेमाचे एक विशाल वर्तुळ तयार झाले, जे सर्व विश्वात पसरले. हे विशुद्ध प्रेम कसे आहे? तर ते पूर्ण आहे. अपूर्ण नाही. ते समग्र आहे. निरंकुश आहे. यामुळे, तुम्हांला, तो ईश्वरच सर्वत्र भरून राहिला आहे याची अनुभूती येते. अनेकत्वातील एकत्व उमगते. अशा प्रकारे, ज्ञानोत्तर भक्तीयोगामुळे

'तत्त्वमसि' या महावाक्याचा बोध होतो.

आता आपल्याला चौथ्या घाटाकडे वा स्थानाकडे जावयाचे आहे. कृती आणि कर्मयोग, ज्ञान आणि ज्ञानयोग, आणि या दोघांच्या संगमामुळे झालेला प्रेममय भक्तीयोग, या सर्वांना उल्लंघून जाणारा, आणि साधकाची उच्चतम अवस्था गाठणारा असा हा मार्ग आहे. याचे नाव राजयोग. या राजयोगात काय घडते? या अवस्थेत, बाह्य प्रसंग व कोणत्याही बाह्य परिस्थितीचा आपल्या जाणिवेवर परिणाम होत नाही. घडणाऱ्या घटनांमध्ये, कोणताही बदल करण्याचा आपण प्रयत्न करत नाही. फक्त, त्या सर्वांकडे अलिप्ततेने, साक्षीभावाने पाहतो. तेंव्हा सर्वांच्यात असून नसणे, ही राजयोगाची खूण आहे. या अवस्थेत कोणतीही इच्छा नाही, वासना नाही. काही विशेष व्हावे ही पण आकांक्षा नाही. या अवस्थेत, आयुष्यात जे काही घडेल आणि जे माझ्यासमोर येईल, त्याचा मी स्वीकार करतो. जेंव्हा, तुम्ही, कोणत्याही गोष्टीचा, बिनशर्त स्वीकार करता, त्याबद्दलचे धैर्य दाखवता, तेंव्हा, तुम्हांला काहीच साध्य करायचे नसते. कुठल्याही गोष्टीसाठी धडपड करायची नसते, प्रशांतीची स्थिती अनुभवून, एक निरीक्षक या नात्याने, सगळीकडे साक्षीभावाने पाहायचे आहे. त्यामुळे तुम्ही सदा समाधानी असतां. संतृप्त असतां आणि ब्रह्मानंदात राहता. साक्षीभाव यालाच म्हणावयाचे, अशा तऱ्हेने स्थिर झालेल्या साक्षीभावात, कर्म, ज्ञान आणि भावना, उच्चतम स्थानी जाऊन पोचतात. ही झाली देहतादात्म्य लोप पावलेली विदेही स्थिती. ब्राह्मी स्थिती.

अशा प्रकारे, सतत वाहणाऱ्या, कुंठित न होणाऱ्या, जीवनप्रवाहाच्या या चार अवस्था असतात, ज्यामुळे आपल्याला आनंद प्राप्त होतो. या जीवनप्रवाहाला आपण थांबवण्याचा प्रयास करायचा नाही. मला, असे काही लोक माहीत आहेत, की ते फक्त एकाच पायरीवर येऊन थांबतात. काही मंडळी दुसऱ्या पायरीवर येऊन तिथेच थांबतात. कारण, त्यांना असे वाटते की त्यांची साधना या अवस्थेत पूर्ण झाली आहे. अभ्यासाची इथेच इतिश्री आहे. पण तसे नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे, सतत वाहणाऱ्या, या जीवनप्रवाहाबरोबरच आपल्याला प्रवास करायला हवा. यामध्येच तुम्हांला ब्रह्मानंदाची अनुभूती येईल. सच्चिदानंद- सत्, चित्, आनंद- हे तीनही आत्मा किंवा स्व किंवा ब्रह्म, तुमच्यातील दिव्यत्वाला, त्या हृदयस्थ परमेश्वराला निर्देशित करतात. ही चौथी पायरी म्हणजे तुमच्यांत स्थिर झालेला साक्षीभाव, जो पहिल्या तीन पायऱ्या ओलांडून गेल्यावरच प्राप्त होतो. दुर्दैवाची गोष्ट अशी की, काही लोक याच तीन पायऱ्यांना किंवा अवस्थांना, त्या एकमेकांच्या विरोधात आहेत, एकमेकांचे खंडन करणाऱ्या आहेत असे समजतात. पण तसे आजिबात नाही. प्रत्येक अवस्था तुम्हांला प्रगतीपथावर नेण्यासाठी, पुढच्या अवस्थेकडे घेऊन जाते, हे सत्य आहे.

म्हणून, आजच्या सकाळच्या सत्रांत, आपण, 'आयुष्य हा एक प्रवाह आहे' हा विषय घेतला. प्रसन्न, समाधानी चित्त आणि आनंदमयी आयुष्यासाठी आपण, या जीवनप्रवाहाबरोबर, कोणताही विरोध न करता, प्रवास करायला हवा.

भगवान बाबांचा कृपाशीर्वाद तुम्हांला प्राप्त होवो.

तुमचा खूप आभारी आहे.

***